# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 08/12/2022 (गुरूवार) दुपार

---

### जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. खापरखेडा** :— पो.स्टे. खापरखेडा येथे फिर्यादी नामे— सौ. अनिता राजेश सिरसाम, वय ४८ वर्ष, रा. इंदीरा नगर, खापरखेडा यांचे रिपोर्ट वरुन अप. क्र. ४८३/२०२२ कलम ३६३, ३७६(३) भादवी सहकलम ४, ०६ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

१५ वर्षीय पीडिता ही फिर्यादीची अल्पवयीन मुलगी असुन हिला आरोपी नामे— आकाश संजय इरपाची, वय २२ वर्ष, रा. आंबादी वार्ड क्र. ०४ खापरखेडा याने फुस लावुन पळवुन नेले व लग्नाचे आमीष दाखवुन पळवुन नेले व जबरी संभोग केला अशा फिर्यादीचे तोंडी रीपोर्टवरून सदरचा गुन्हा नोंद केला.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक नंदा पाटील पोलीस स्टेशन कन्हान यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टमध्ये सादर केले. दिंनाक ०८/१२/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. श्रीखंडे, अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३६३ भांदवि मध्ये ०३ वर्ष सश्रम कारावास व १०००/—रू. दंड दंड न भरल्यास ०१ महीना साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती. सोनाली राऊत यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोलीस हवालदार ज्ञानेश्वर मिश्रा पोस्टे खापरखेडा यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**